## महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
## भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ

फोन नं. ः०२२ – २४०९३११०
०२२ – २४०३१४९८
फॅक्स क्र ः ०२२ – २४०९३११०
www.cpfmseb.2011@gmail.com
website : www.mahadiscom.in

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
भविष्य निर्वाह निधी विभाग,
धारावी रोड, माटुंगा (पू) मुंबई ४०० ०१९.

क्र.लेवि/भनिनि /कनिवेयो/ D/ 4938

दिनांक: 19 AUG 2017

**परिपत्रक क्र- १९५ (ब)**

**विषय :- "कर्मचारी निवृत्ती वेतन योजना १९९५" चे निवृत्ती वेतन प्रस्ताव आणि "कर्मचारी अनुबध्द ठेव विमा योजना १९७६ (ई.डि एल.आय.)" चे प्रस्ताव / दावे दाखल करणे बाबत सहा. आयुक्त, क्षेत्रिय भविष्य निर्वाह निधी कार्यालय, बांद्रा मुंबई - ५१ यांनी केलेल्या सुचनांचे पालन करणे बाबत.**

सहा. आयुक्त कर्मचारी भविष्य निधी बांद्रा मुंबई - ५१ यांनी दि. ०६.०७.२०१७ रोजी घेतलेल्या मिटिंग मध्ये कर्मचारी (सभासदाची) निवृत्ती वेतन प्रस्ताव त्वरीत निकाली काढून त्यांचे निवृत्ती वेतन तात्काळ सुरु करण्यासाठी आणि तसेच मृत सभासद (कर्मचारी) यांचे कर्मचारी अनुबध्द ठेव विमा योजना (ई.डिएल.आय.) चे दावे सुध्दा त्वरीत निकाली काढण्यासाठी काही सुचना दिल्या त्या बाबत या कार्यालया कडून सहा. आयुक्तांनी दिलेल्या सुचनांचे काटेकोर पालन करण्यासाठी खालील प्रमाणे निर्देश जारी करण्यात येत आहेत.

१) बँकेत खाते उघडताना पति / पत्नीच्या नावाचे संयुक्त खाते किंवा पति / पत्नीच्या नावाचे स्वतंत्र खाते असल्यास सेवा निवृत्तीचा प्रस्ताव कर्मचा-या कडून स्विकारण्यात यावा.

२) सेवा काळातील बिनपगारी रजेचा (EOL) तपशिल दर्शविताना कर्मचा-याची निवृत्ती वेतन निधीची रक्कम पुर्ण कपात झाली असेल (जसे रु. ४१७/-, ५४१/- व रु. १२५०/- इ.) तर त्या कर्मचा-याची त्या महिन्यात बिनपगारी रजा असली तरी ती रजेच्या तक्त्यात दर्शविण्यात येवू नये.

३) क.नि.वे. योजना १९९५ चा फॉर्म एफ - २ सादर करताना विहीत नमुन्यात सर्व वारसांची नावे व जन्मतारखा नमुद करुन सदर फॉर्म कार्यालयीन साक्षांकनासहीत सादर करावा व या संदर्भात सदर कर्मचारी / सभासदाकडून कायदेशीर वारस प्रमाणपत्र (Legal heir certificate) घेण्याची आवश्यकता नाही.

४) मयत कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन प्रस्ताव व ई.डिएल.आय. (कर्मचारी अनुबध्द ठेव विमा योजना १९७६) प्रस्ताव नामनिर्देशन प्रतीसह एकाच वेळी पाठविण्यात यावेत. दोन्ही प्रस्ताव स्वतंत्रपणे पाठविण्यात येवू नयेत. मा.सं. विभागाने याबाबत कर्मचा-याच्या वारसास अवगत करुन त्यांना दोन्ही प्रस्ताव एकाच वेळी सादर करण्याविषयी लेखी कळवावे.

५) कर्मचारी निवृती वेतन प्रस्ताव कर्मचारी निवृत्त होताच ७ दिवसाच्या आत या कार्यालयात पाठविण्यात यावेत.

६) एकाच महिन्यात एकापेक्षा अधिक महिन्याचा पुरवणी पगारासह पगार देण्यात आला असेल तर कर्मचारी सेवानिवृत्ती निधी ची (EPF) कपात प्रत्येक महिन्याची स्वतंत्र दाखवावी व त्याचा रोख प्रमाणक क्रमांक / दिनांक विवरण पत्रात दाखवावा.

७) ६० व्या वर्षी निवृत्त होणा-या कर्मचा-याचे प्रस्ताव वयाची ५८ वर्षे पुर्ण होताच मासं विभागाने कर्मचा-यास सादर करण्यास पत्राद्वारे कळविण्यात यावे.

८) निवृत्ती वेतनाच्या प्रस्तावा सोबत सभासद व पत्नीचे आणि मयत कर्मचा-याचे बाबतीत सर्व सभासद पती / पत्नी आणि २५ वर्षाखालील सर्व अपत्याचे आधारकार्ड सादर करावेत.

९) मा.सं. विभागाने निवृत्ती वेतनाचे संगणकावर तयार केलेले प्रस्ताव २ प्रतीत कर्मचारी व नियंत्रणाधिका-याच्या सहीसह आणि सर्व कागदपत्रासह भविष्य निर्वाह निधी कार्यालयास त्वरीत पाठवावेत.

हे परिपत्रक महानिर्मिती/महापारेषण/महावितरण कंपनींच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सचिव
म.रा.वि.मंडळ, भ.नि.नि. कार्यालय,
माटुंगा रोड, धारावी, मुंबई - १९.

प्रत:- प्रेषण यादीप्रमाणे:-
महानिर्मिती/महापारेषण/महावितरण